नाशिक महानगरपालिका, नाशिक.
Rajeev Gandhi Bhavan, Sharanpur Road, (Post Box no.12), Nashik-422 002.
Visit us at : www.nmc.gov.in E-mail: dmc_lic@nmc.gov.in ph.no. 0253-2222476

जा. क्र.जापवि/कक्ष-१/१५० /२०२०
दिनांक :-१० /०३ /२०२०
NMC/DTD/OWL/२०२०/ 157

**वाचा** :-१.आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०,३३, ३४, ४१ व कलम ५१.
२.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक:करोना २०२०/ प्र.क्र.५८/ आरोग्य-५, दि.१३/०३/२०२०, दि.१४/०३/२०२०.
३.मा. मुख्य सचिव , महाराष्ट्र राज्य यांचे कडील आदेश क्र.डीएमयु/२०२०/सीआर,९२/डीआयएसएम-१ दि.१४ फेब्रुवारी, २०२१,
४.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक यांची दि.०८/०३/२०२१ रोजी झालेली बैठक.
५.मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक यांचेकडील - क्र. कक्ष/कोरोना विषाणू/७६/२०२१ दि.०८/०३/२०२१

---

**आदेश**

ज्याअर्थी, शासनाने कोरोना विषाणुचा (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. सदर अधिसूचनेनुसार प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी क्षेत्र प्रतिबंधित करण्याकरीता महानगरपालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी संदर्भिय क्र. ३ मधील दि.१४/०२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये **मिशन बिगीन अगेन** अंतर्गत साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अन्वये संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात कोरोना विषाणू (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत निर्बंध सुकर करणे तसेच टप्याटप्याने टाळेबंदी उघडणेबाबत (Easing of Restrictions and Phase-wise opening of Lockdown.) निर्देश दिलेले असून, लॉकडाऊन (Lockdown) चे आदेशास दि.३१/०३/२०२१ पर्यंत काही अटी व शर्तीचे अधिन राहून महाराष्ट्र राज्यात अधिसूचना जाहीर करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, संदर्भिय क्र.४ च्या बैठकीत नाशिक जिल्हयातील कोविड-१९ बाबत वाढत्या रुग्ण संख्येचा आढावा घेण्यात आला असता, सद्यस्थितीमध्ये कोविड-१९ चे मोठया प्रमाणावर वाढत असलेल्या रुग्ण संख्येवर आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्याचे अगत्याचे झालेले आहे. ही बाब विचारात घेवून याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या स्वरुपाची रुपरेषा निश्चित करण्यात आलेली असून, त्याबाबत संदर्भिय क्र. ५ अन्वये नाशिक जिल्हयामध्ये निर्बंध लागू करणेत आलेले आहेत.

ज्याअर्थी , संदर्भिय क्र.५ मध्ये निर्देशित केलेप्रमाणे, कोरोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार आणि नाशिक महानगरपालिका क्षेत्रात लागू झालेली संचारबंदी विचारात घेऊन, नाशिक महानगरपालिका क्षेत्रात देखील सदरचे निर्बंध लागू करणेत येत असून, खालीलप्रमाणे सूचनांचे पालन करणे अनिवार्य राहील.

१. सर्व दुकाने सकाळी ७.०० ते रात्रौ.७.०० वा. या कालावधीत चालु राहतील. (अत्यावश्यक सेवा / मनुष्य व प्राणीमात्रासाठी जीवनावश्यक वस्तू, भाजीपाला, फळे किराणा, दुध व वृत्तपत्रे वितरण वगळून)
२. प्रत्येक शनिवार व रविवार या दिवशी सर्व दुकाने पूर्णपणे बंद राहतील. (अत्यावश्यक सेवा / मनुष्य व प्राणीमात्रासाठी जीवनावश्यक वस्तू, भाजीपाला, फळे किराणा, दुध व वृत्तपत्रे वितरण वगळून)
३. शहरातील सर्व आठवडे बाजार बंद राहतील.
४. सर्व प्रकारचे सामाजिक, राजकिय, धार्मिक कार्यक्रम / उत्सव, समारंभ यांना परवानगी देणेत येऊ नये.
५. भाजी मंडईमध्ये दैनंदीन स्वच्छता / निर्जुतुकीकरणची व्यवस्था करणेत यावी. एकाच ठिकाणी गर्दी होऊ नये याबाबत जबाबदारी संबंधित नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांवर सोपविणेत यावी.
६. गर्दी होत असल्यास पोलीस विभागाची मदत घेवून प्रसंगी भाजी मंडई/ बाजार बंद करणेची कारवाई करावी.
७. जिवनावश्यक वस्तु नियमानुसार विक्री करतांना व सेवा देतांना अनावश्यक गर्दी होणार नाही याकरीता एकाच वेळी पाच पेक्षा जास्त व्यक्तींची उपस्थिती नसावी.

Scanned by CamScanner

८. दोन व्यक्तींमध्ये (विक्रेता व ग्राहक यांच्यात सुरक्षित किमान ६ फूट अंतर राहील. तसेच मनपा भाजी मार्केटमध्ये एका आड एक रिकामा ओटा ठेवावा. रिकामे ओटे ठरवितांना सर्व भाजी विक्रेत्यांना समान संधी मिळेल अशा पध्दतीने आळीपाळीने ओटे रिकामे ठेवणेबाबत नियोजन करावे. यासाठी सुरक्षिततेची सामासिक अंतर निशाने / आखणी करणेची व्यवस्था व सुरक्षिततेची आवश्यक उपाययोजना करणेत यावी.

९. प्रत्येक भाजी विक्रेत्याने वस्तु विक्री व सेवा देणारे भाजी विक्रेत्याने स्वच्छतेचे नियमांचे पालन करतांना हॅण्ड वॉश/ सॅनिटाईझरचा सुरक्षिततेने वापर करावा. तसेच मास्क वापरावा व हातामध्ये हॅन्डग्लोज वापरावेत.

१०. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे व धुम्रपानास मनाई राहील.

११. तसेच, महाराष्ट्र शासनाकडील व मनपाकडील वेळोवळी निर्गमित होणारे आदेशांचे पालन करण्याची जबाबदारी संबंधितांवर बंधनकारक राहील.

वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याची व त्यास व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देणेची जबाबदारी सर्व संबंधितांची जबाबदारी राहील. आदेशाचे उल्लंघन करणारे भाजी- फळविक्रेते –दुकान, संस्था किंवा व्यक्ती कठोर कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश मनपा संकेतस्थळ www.nmc.gov.in वर प्रसिध्द करणेत आलेला आहे.

(कैलास जाधव)
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**प्रत माहितीसाठी / उचित कार्यवाहीस्तव :**

अ) मा. जिल्हाधिकारी,नाशिक तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नाशिक

आ) मा. पोलीस आयुक्त,नाशिक शहर

इ) मा. महापौर, मा. उपमहापौर नाशिक महानगरपालिका,नाशिक

ई) मा. सभागृह नेता / मा. विरोधी पक्षनेता / मा. सर्व पक्षीय गटनेते , नाशिक महानगरपालिका, नाशिक

उ) मा. सभापती, (सर्व समित्यांचे ) नाशिक महानगरपालिका,नाशिक

**प्रत कार्यवाहीसाठी :**

१. सर्व विभागीय अधिकारी, नाशिक महानगरपालिका, नाशिक

२. सर्व विभागप्रमुख, नाशिक महानगरपालिका, नाशिक

३. जनसंपर्क अधिकारी, नाशिक महानगरपालिका , नाशिक

Scanned by CamScanner